# महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९ व (सुधारणा) १९९७ मधील तरतूदी

# महाराष्ट्र राज्यामध्ये फळरोपवाटीकांना अनुज्ञप्ती देण्याची व त्यांचे नियमन करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात, फळरोपवाटीकांना अनुज्ञप्ती देणे व त्यांचे नियमन करणे, तसेच तत्संबंधित बाबीसाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्यांच्या विसाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहेत:--

१. **व्याप्ती व प्रारंभ:-** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) (सुधारणा) अधिनियम, १९६९ असे म्हणता येईल.
(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू असेल.
(३) तो, राज्यशासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

**२. व्याख्या:-** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या अधिनियमात,---
**अ) "सक्षम प्राधिकारी"** म्हणजे कलम ३ अन्वये नेमण्यात आलेले सक्षम प्राधिकारी;
**ब) "फळांचा रोपमळा"** म्हणजे ज्या ठिकाणी नित्याचा व्यवसाय म्हणून फळांच्या रोपांची पैदास करण्यात येते. आणि प्रतिरोपणासाठी त्यांची विक्री करण्यात येते, असे कोणतेही ठिकाण. त्यात, शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाकडून व्यवस्था ठेवण्यात येणा-या फळांच्या रोपमळयांचा समावेश होणार नाही.
**क) "फळांचे रोप"** म्हणजे, खाद्य फळे किंवा कवचधारी फळे देणारे कोणतेही रोप, आणि त्यात, डोळे असलेली फांदी (Budwood), बीजरोप (Seedlings), कलमे (Grafts), दाब कलमे (Layers), बी (Seeds), कंद (Bulb), शोषक (Sucker), कुडे (Rhizomes) आणि अशा कोणत्याही रोपांची छाटकलमे (Cuttings), यांचा समावेश असेल.
**ड)** फळांच्या रोपमळयांच्या संबंधात **"मालक"** म्हणजे, अशा फळांच्या रोपमळयांच्या कारभारावर जिचे किंवा ज्याचे अंतिम नियंत्रण असेल अशी व्यक्ती किंवा असे प्राधिकरण, आणि उक्त कारभार व्यवस्थापक, व्यवस्थापन संचालक, किवा व्यवस्थापन अधिकर्ता यांजकडे सोपविण्यात आला असेल त्या बाबतीत, असा व्यवस्थापक, व्यवस्थापन संचालक किंवा व्यवस्थापन अधिकर्ता हा फळांच्या रोपमळयांचा मालक असल्याचे मानण्यात येईल;
**इ) "विहीत"** म्हणजे, या अधिनियमाखालील नियमांद्वारे विहीत ;
**फ) "मुलकांड"** (Rootstock) म्हणजे, ज्याच्यावर फळांच्या रोपाच्या कोणत्याही भागाचे कलम केले असेल (Grafted) किंवा डोळा भरण्यात आला असेल असे फळाचे रोप किंवा त्याचा भाग ;
(फअ) फळांच्या रोपांची विक्री म्हणजे, राज्यांतर्गत रोख किंवा स्थगित प्रदान किंवा इतर किंमती मोबदल्यात केलेली फळांच्या रोपांची विक्री.
**ग) "कलम"** (Scion) म्हणजे, मुलकांडावर ज्याचे कलम करण्यात आले असेल किंवा ज्याने मुलकांडाचा डोळा भरण्यात आला असेल अशा फळाच्या रोपाचा भाग.

**३. सक्षम प्राधिका-यांची नियुक्ती** :- राज्य शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ---
**(अ)** त्यास योग्य वाटतील अशा शासनाचे राजपत्रीत अधिकारी असणा-या व्यक्तींची, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सक्षम अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल, आणि
**ब)** ज्या क्षेत्र मर्यादेत या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये सक्षम प्राधिका-यास प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा तो वापर करु शकेल आणि सोपविलेली कर्तव्ये पार पाडु शकेल ती क्षेत्र मर्यादा निर्धारीत करता येईल.

**४. १) प्रत्येक फळांच्या रोपमळयाच्या मालकाने (आणि फळांच्या रोपांच्या विक्रीचा धंदा करणा-या व्यक्तीने) लायसन्स घेणे** :- फळांच्या रोपमळयांचा कोणताही मालक या अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख किंवा तो ज्या तारखेस अशा रोपमळयाचा मालक होईल ती तारीख यापैकी जी नंतरची असेल अशा तारखेपासून ६ महिने संपल्यानंतर या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमाच्या उपबंधान्वये त्याने घेतलेल्या लायसन्सअन्वये आणि त्यास अनुसरुन असेल त्याखेरीज, फळांच्या रोपमळयाचा धंदा चालविणार नाही किंवा करणार नाही.

**२)** फळांच्या रोपमळयांचा मालक नसलेली कोणतीही व्यक्ती महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या तारखेपासून सहा महिने संपल्यानंतर, या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतूदी अन्वये तिने मिळविलेल्या अनुज्ञप्तीअन्वये आणि त्यास अनुसरुन असेल त्याखेरीज एरवी, फळांच्या रोपांच्या विक्रीचा किंवा खरेदीचा धंदा चालविणार नाही किंवा करणार नाही.

**स्पष्टीकरण** - एखादया मालकाचे फळांचे एकापेक्षा अधिक रोपमळे असतील मग ते त्याच नगरात किंवा गावात असोत अगर निरनिराळया नगरांमध्ये किंवा गावांमध्ये असोत, तेव्हा तो, फळांच्या अशा प्रत्येक रोपमळयासाठी वेगवेगळी लायसन्स घेईल.

**४. अ)** कलमे ५, ६, ८, ९, १० आणि ११ यांच्या तरतूदी, योग्य त्या फेरफारासह, फळांच्या रोपांच्या विक्रीकरिता अनुज्ञप्ती देण्याच्या बाबतीत लागू होतील आणि सक्षम प्राधिकारी त्याला फळांच्या रोपमळयांच्या मालकाला दिलेल्या अनुज्ञप्तीच्या बाबतीत जे अधिकार असतात आणि जे तो वापरतो तेच अधिकार असतील आणि तेच तो वापरील.

**५. लायसन्सच्या मंजूरीसाठी व त्याचे नूतनीकरण करण्याकरीता अर्ज** :- **(१)** निकटपूर्वीच्या कलमामध्ये निर्दीष्ट केलेला परवाना घेण्याची इच्छा असणारा कोणताही मालक, विहीत करण्यात येईल आणि अशा रीतीने, सक्षम प्राधिका-याकडे लेखी अर्ज करील आणि त्यासोबत जी पन्नास रुपयापेक्षा अधिक नसेल अशी विहीत करण्यात येईल इतकी फी देईल.

(१-अ) सक्षम प्राधिकारी, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला प्रत्येक अर्ज, तो मिळाल्यापासून एका महिन्याच्या कालावधीमध्ये आणि पोटकलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रितीने निकालात काढील.

**(२)** असा अर्ज मिळाल्यावर सक्षम प्राधिकारी स्वत: किंवा प्रतिनिधीमार्फत त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करील

**(अ)** ज्या फळांच्या रोपमळयांच्या संबंधात परवान्यासाठी अर्ज करण्यात आला असेल तो रोपमळा फळांच्या रोपांच्या उचित पैदासीसाठी योग्य आहे;

**(ब)** अर्जदार, असा फळांचा रोपमळा चालविण्यास सक्षम आहे.

**(क)** अर्जदाराने विहीत करण्यात आलेली परवाना फी दिली आहे;

**(ड)** पैदास करण्यात येणा-या रोपांचा दर्जा आणि त्याची वाजवी दराने विक्री सुनिश्चित करणा-या, विहीत करण्यात येतील अशा शर्ती, अर्जदार पु-या करीत आहे किंवा त्या पु-या करण्याची हमी देत आहे;

याबद्दल समक्ष प्राधिका-याची खात्री होइल तर, तो अर्जदारास अर्ज मिळाल्यापासून ३० दिवसांत लायसन्स मंजूर करील, सक्षम प्राधिका-याची तशी खात्री न झाल्यास, त्यास, आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी अर्जदारास दिल्यानंतर आणि परवाना नाकारण्याच्या कारणाने संक्षिप्त निवेदन नमूद केल्यानंतर परवाना मंजूर करण्यास नकार देता येईल, आणि अशा निवेदनाची एक प्रत अर्जदाराला देता येईल आणि त्याने दिली असेल अशी परवाना फी त्यास परत करण्यात येईल.

**(३)** या कलमान्वये मंजूर करण्यात आलेला प्रत्येक परवाना त्यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीपर्यंत विधीग्राहय असेल; आणि सक्षम प्राधिका-याकडे अर्ज करण्यात आल्यावर विहीत करण्यात येईल अशा मुदतीकरीता आणि विहीत करण्यात येईल अशी फी दिल्यानंतर आणि अशा शर्तीवरच वेळोवेळी त्याचे नूतनीकरण

करण्यात येईल. परवान्याच्या नूतनीकरणास सक्षम प्राधिकारी नकार देईल त्याबाबतीत तो अशा नकाराबाबतच्या कारणांचे संक्षिप्त निवेदन नमूद करील आणि त्याची एक प्रत अर्जदारास देईल;
परंतू, अर्जदारास, आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय परवान्याच्या नवीकरणास नकार देणारा कोणताही आदेश काढता येणार नाही.

**६. लायसन्सधारकाची कर्तव्ये:-**

या अधिनियमाखालील प्रत्येक परवानाधारक ---

**(अ)** सक्षम प्राधिका-याकडून निर्देशित करण्यात येईल त्याप्रमाणे, कलम (Scion) किंवा मुलकांड (Rootstock) यांच्या संबंधात पैदाशीकरिता किंवा विक्रीकरिता परवान्यामध्ये निर्दिष्ट केलेल्या फळांच्या रोपांच्या प्रकारांचाच केवळ वापर करण्याची हमी देईल;

**(ब)** प्रत्येक मुलकांड (Rootstock) व प्रत्येक कलम (Scion) यांचा उगम व उत्पत्ती याबद्दलची संपूर्ण माहिती ठेवील व तीत पुढील गोष्टी दर्शविण्यात येतील:---

**(एक)** वापरण्यात आलेल्या मुलकांडाचे (Rootstock) कोणतेही स्थानिक नाव असेल तर त्यासह त्याचे वनस्पतीशास्त्रातील नांव;

**(दोन)** फळांची रोपे वाढवितांना, वापरलेल्या कलमाचे (Scion) कोणतेही स्थानिक नाव असेल तर त्यासह त्याचे वनस्पतीशास्त्रातील नाव;

**(क)** फळाची रोपे वाढवितांना वापरण्यात आलेला प्रत्येक मुलकांडाच्या (Rootstock) आणि कलमाच्या (Scion) झाडाची जागा दर्शविणारा आराखडा ठेवील;

**(ड)** रोपांचे वाफे, तसेच फळांच्या रोपाच्या पैदासीसाठी वापरण्यात आलेली जनक झाडे विनाशी किटक व वनस्पती रोग यापासून मुक्त ठेवील;

**(इ)**सक्षम प्राधिका-याकडून निदेश देण्यात येतील अशा रीतीने, फळांची रोपे तयार करण्याची हमी देईल;

**(फ)** विक्रीचा उददेश असलेल्या कोणत्याही पुडक्यात बंद केलेल्या फळांच्या रोपाच्या प्रत्येक प्रकाराचे नांव विहीत रीतीने ठरविण्यात आलेले, त्याचे वय आणि अशा प्रत्येक फळांच्या रोपाच्या कलमांच्या (Scion) नावासह, मुलकांडाचे (Rootstock) नाव, ठळक रीतीने खूण चिठठीवर विनिर्दिष्ट करील;

**(ग)** कोणत्याही प्रकारचे विनाशी किटक किंवा वनस्पती रोग यापासून संपूर्णपणे मुक्त असतील अशीच निरोगी फळांची रोपे विक्रीसाठी व वाटपासाठी देण्यात येतील याची हमी देईल;

**(ह)** कोणत्याही व्यक्तीला विकलेल्या फळांच्या रोपांचे नांव, त्याचे वय, मुलकांड आणि कलम याचे नांव आणि ते खरेदी करणा-या व्यक्तीने नांव व पत्ता दर्शविणारी एक नोंदवही सक्षम प्राधिका-याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नमुन्यात ठेवील.

**७. विवक्षित फळांच्या रोपांची आयात-निर्यात किंवा परीवहन यांचे नियमन करण्याची किंवा मनाई करण्याची राज्य सरकारची शक्ती** - राज्याच्या कोणत्याही भागास पैदास करण्यात येणा-या फळांच्या रोपांचा दर्जा टिकविण्याच्या किंवा त्याचे हानिकारक विनाशी किटकांपासून किंवा वनस्पती रोगांपासून संरक्षण करण्याच्या प्रयोजनाकरीता, राज्यशासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, राज्य शासन घालील अशा निर्बंधास आणि शर्तीस अधिन राहून, अज्ञात अभिजातीच्या कोणत्याही फळांचे रोप, किंवा कोणत्याही संक्रामक किंवा सांसर्गिक किड किंवा रोग याची बाधा झालेल्या फळांचे रोप, केंद्र सरकारने निर्धारीत केल्याप्रमाणे सीमाशुल्क सरहददीवरील ने-आण वगळता, राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात आणणे किंवा त्यामधून ते बाहेर नेणे, किंवा राज्याअंतर्गत त्याचे परीवहन करणे यांचे नियमन करता येईल किंवा त्यास मनाई करता येईल.

**८. परवाना रद्द करण्याची किंवा निलंबीत करण्याची शक्ती:-** (१)सक्षम प्राधिका-यास या अधिनियमान्वये देण्यात आलेला किंवा नूतनीकरण करण्यात आलेला कोणताही परवाना पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक कारणामुळे निलंबीत किंवा रद्द करता येईल :

**(अ)** त्याने फळाच्या रोपमळयावरील त्याचे नियंत्रण, पुर्णत: किंवा अंशत: सोडून दिले असेल किंवा अशा फळांचा रोपमळा चालविणे किंवा तो धारण करणे त्याने अन्यथा बंद केले असेल,

**(ब)** राज्य शासनाने शासकीय राजपत्रात अधिसूचनेव्दारे कोणत्याही फळाच्या रोपाच्या कोणत्याही प्रकारचा कमाल दर किंवा किंमत निश्चित केलेली असेल त्याबाबतीत त्याने फळांचे असे कोणतेही रोप अधिक दराने किंवा किमतीस विकले असेल,

**(क)** त्याने परवान्याच्या अटी व शर्तीपैकी कोणत्याही अटीचे व शर्तीचे किंवा सक्षम प्राधिका-याने कायदेशीररीत्या दिलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात, योग्य कारणाशिवाय कसूर केली असेल किंवा त्याने हा अधिनियम किंवा त्या अन्वये केलेले नियम यांच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन केलेले असेल,

**(ड)** कोणत्याही इतर विहीत कारणावरुन.

**(२)** सक्षम प्राधिका-यास परवान्याच्या संबंधात पोटकलम (१) अन्वये तो रद्द करण्याचा आदेश होईपर्यंत परवाना निलंबीत करता येईल.

**(३)** पोटकलम (१) अन्वये आदेश देण्यापूर्वी, सक्षम प्राधिकारी ज्या कारणामुळे कारवाई करण्याचे ठरविले असेल ती कारणे परवानाधारकाला कळवील आणि अशा कारवाई विरुध्द कारण दाखविण्याची वाजवी संधी त्याला देईल.

**(४)** पोट कलम(१) किंवा (२) अन्वये देण्यात आलेल्या प्रत्येक आदेशाची एक प्रत परवानाधारकाला ताबडतोब पाठविण्यात येईल.

**९.१ परवाना परत करणे** - परवान्यामध्ये विनिर्दिष्ट केलेला विधिग्राहयतेचा कालावधी संपल्यानंतर किंवा परवाना निलंबीत केल्याचा किंवा रद्द केल्याचा आदेश मिळाल्यानंतर परवानाधारक तो परवाना सक्षम प्राधिका-याकडे परत करील;

परंतु,(परवाना) समाप्त करण्यात, निलंबीत करण्यात किंवा रद्द करण्यात आल्यानंतर असा सक्षम प्राधिकारी, मालकाला आपल्या फळांच्या रोपमळ्याचे समापन करणे, शक्य व्हावे यासाठी, त्याला योग्य वाटेल इतका वेळ त्यास देईल.

**१०. परवान्याची दुसरी प्रत**:- मालकाला दिलेला परवाना हरविला असेल, नष्ट झाला असेल, जीर्णशीर्ण किंवा खराब झाला असेल तर, सक्षम प्राधिकारी अर्ज केल्यावर आणि विहीत केलेली फी दिल्यावर परवान्याची दुसरी प्रत देईल.

**११. अपीले** :- **(१)** परवाना देण्यास किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास नकार देणा-या किंवा तो निलंबीत किंवा रद्द करणा-या सक्षम प्राधिका-याच्या आदेशामुळे, आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणा-या कोणत्याही व्यक्तीस, विहीत करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीताने, अशा कालावधीत आणि अशा प्राधिका-याकडे अपील करता येईल;

परंतु, अपीलदारास वेळेवर अपील दाखल करण्यास पुरेशा कारणामुळे विलंब झाला याबद्दल अपील प्राधिका-याची खात्री झाली तर, अपील प्राधिका-यास, विहीत कालावधी संपल्यानंतर, अपील स्विकारता येईल.

**(२)** पोट कलम (१) खालील अपील मिळाल्यानंतर, अपील प्राधिकारी अपीलदारास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अपीलावर, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे आदेश देईल.

**(३)** या कलमान्वये देण्यात आलेला आदेश पुढील अनुवर्ती कलमाच्या उपबंधांना अधीन राहून, अंतिम असेल.

**१२. पुनर्निरीक्षण**:- (१) राज्य शासन, स्वाधिकारे किवा, आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणा-या व्यक्तीने त्याच्याकडे केलेल्या अर्जावरुन कोणत्याही वेळी, या अधिनियमांन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचा कायदेशीरपणा किंवा औचित्य याबद्दल स्वत:ची खात्री करुन घेण्याच्या प्रयोजनाकरीता कोणत्याही प्रकारचे अभिलेख मागविता येतील आणि तपासणी करता येईल आणि त्यास योग्य वाटेल असा आदेश त्यावर देता येईल;

परंतु, ज्या आदेशाविरुध्द निकटपूर्वीच्या कलमांन्वये दाखल करण्यात आलेले अपील प्रलंबीत असेल त्या आदेशाच्या संबंधात किंवा अपीलासाठी असलेली कालमर्यादा संपण्यापूर्वी दाखल करण्यात आले त्या अर्जाच्या बाबतीत, राज्य शासन, या कलमान्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करणार नाही.

तसेच, राज्य शासन या कलमाखालील ज्या कोणत्याही आदेशामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परीणाम होत असेल त्या व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज असा आदेश देणार नाही.

(२) या कलमान्वये देण्यात आलेला आदेश अंतिम असेल.

**१३. प्रवेश करण्याची व निरीक्षण करण्याची शक्ती** :- (१) कोणत्याही फळाच्या रोपमळयाच्या किंवा फळांची रोपे जेथे विकली जातात त्या धंद्याच्या जागेच्या स्थितीबद्दल खात्री करुन घेण्याच्या प्रयोजनार्थ किंवा त्यांच्या कामाची तपासणी करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा या अधिनियमात किंवा याअन्वये करण्यात आलेल्या नियमात उल्लेखिलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनार्थ सक्षम प्राधिका-यास, किंवा त्याने किंवा राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, सर्व वाजवी वेळांमध्ये सहाय्यकासह किंवा सहाय्यकाशिवाय ---

**(अ)** फळांच्या कोणत्याही रोपमळयात किंवा फळांची रोपे जेथे विकली जातात त्या धंद्याच्या जागेत प्रवेश करण्याचा आणि त्यामधील फळांच्या रोपांचे तसेच फळरोपाच्या वृध्दीसाठी वापरण्यात येणा-या माध्यम/साहित्याचे निरीक्षण किंवा तपासणी करण्याचा, अधिकार असेल.

**(ब)**अशा रोपमळयाच्या किंवा अशा धंद्याच्या जागेच्या संबंधात कोणतीही हिशोबाची पुस्तके, नोंदणी पुस्तके, अभिलेख किंवा इतर लेख सादर करण्याबद्दल आदेश देण्याचा आणि त्यामधून उतारे किंवा लेखाच्या प्रती घेण्याचा किंवा घेवविण्याचा , अधिकार असेल.

**(क)** आवश्यक ते सर्व प्रश्न विचारण्याचा आणि अशा रोपमळयावर नियंत्रण करणा-या किंवा त्यासंबंधात कामावर ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीची तपासणी करण्याचा, अधिकार असेल.

**(२)** लायसन्सधारक आणि अशा रोपमळयासंबंधीची किंवा अशा धंद्याच्या जागेच्या संबंधीचे कामावर ठेवलेल्या सर्व व्यक्ती, सक्षम प्राधिकारी किंवा प्राधिकृत व्यक्ती यांस, उपरोक्त प्रयोजनार्थ आवश्यक असेल त्याप्रमाणे निरीक्षणासाठी व तपासणीसाठी वाजवी प्रवेश करु देतील व सर्व वाजवी सोयी उपलब्ध करुन देतील आणि आपल्या माहितीनुसार व विश्वासानुसार सर्व प्रश्नांची उत्तरे देतील. आपल्या कब्जातील लेख सादर करणे, आणि अशा प्राधिका-यास किंवा व्यक्तीस आवश्यक वाटेल अशी, फळांच्या रोपमळयासंबंधीची किंवा फळांची रोपे जेथे विकली जातात त्या धंद्याच्या जागेच्या संबंधीची इतर माहिती देणे, त्यांना बंधनकारक असेल.

**१४ शास्ती** :- कोणतीही व्यक्ती---

**(अ)** या कलमान्वये शिक्षापात्र ठरविण्यात आलेल्या या अधिनियमांच्या किंवा त्याअधीन करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील; किंवा-

**(ब)** या अधिनियमांन्वये किंवा तदन्वये कोणत्याही अधिका-यास किंवा व्यक्तीस प्राप्त करण्यात आलेल्या शक्तींचा तो वापर करीत असतांना किंवा तिच्यावर सोपविण्यात आलेले कोणतेही कर्तव्य बजावीत असतांना, त्यास अडथळा करील; तर त्या व्यक्तीस दोषसिध्दीनंतर सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

**१५. कंपन्यांनी केलेले अपराध** :- **(१)** या अधिनियमाखालील अपराध एखादया कंपनीने केला असेल त्याबाबतीत अपराध घडण्याच्या वेळी, कंपनीचा धंदा चालविण्यासाठी कंपनी ज्या व्यक्तीच्या स्वाधीन होती आणि जी व्यक्ती तिला जबाबदार होती ती प्रत्येक व्यक्ती त्याचप्रमाणे कंपनी ही, अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल. आणि त्याचप्रमाणे ती तिजविरुध्द खटला केला जाण्यास व शिक्षा केली जाण्यास पात्र ठरतील;

परंतु, अशी कोणतीही व्यक्ती, असा अपराध तिच्या नकळत झाला आहे किंवा असा अपराध होऊ नये म्हणून तिने सर्व वाजवी दक्षता घेतली होती असे सिध्द करील तर ती या पोटकलमातील कोणत्याही गोष्टीमुळे व अधिनियमात उपबंधीत कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

**(२)** पोटकलम(१) मध्ये काहीही अंतर होत असले तरी एखादया कंपनीने या अधिनियमाखालील एखादा अपराध केलेला असेल व तो अपराध कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिका-याच्या संमतीने किंवा त्याने काणाडोळा केल्यामुळे किंवा त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हयगयीमुळे घडलेला आहे, असे सिध्द होईल, त्याबाबतीत असा संचालक, व्यवस्थापक, सचिव, किंवा इतर अधिकारी,

हासुध्दा त्या अपराधाबददल दोषी आहे असे मानले जाईल. आणि त्यानुसार त्याच्याविरुध्द खटला केला जाण्यास व शिक्षा केली जाण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण :**- या कलमाच्या प्रयोजनार्थ :-

**(अ)** "कंपनी" म्हणजे कोणतेही निगम निकाय आणि त्यात, एखादया भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तीच्या इतर संघाचा समावेश होतो.

**(ब)** एखादया भागिदारी संस्थेच्या संबंधात "संचालक" म्हणजे भागिदारी संस्थेतील एखादा भागिदार.

**१६. अपराधाची दखल घेणे** :- सक्षम प्राधिका-याने किंवा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याने या अधिनियमान्वये शिक्षा पात्र असलेला अपराध ज्या तथ्यांचा मिळून बनलेला असेल तया तथ्यांविषयी लेखी प्रतिवेदने केले असेल त्याव्यतिरीक्त कोणतेही न्यायालय अशा अपराधांची दखल घेणार नाही.

**१७. न्यायालयाची अधिकारीता** :- इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्गाचा दंडाधिकारी यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेले कोणतेही न्यायालय या अधिनियमांन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्याय-चौकशी करणार नाही.

**१८. या अधिनियमान्वये शक्तींचा वापर करणारे अधिकारी व व्यक्ती हे लोकसेवक असतील** :- या अधिनियमांन्वये नियुक्त केलेले सर्व अधिकारी, आणि या अधिनियमांव्दारे किंवा तद्अन्वये तिला प्रदान केलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करण्यासाठी व त्याच्यावर सोपविलेली कोणतेही कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्राधिकृत केलेली प्रत्येक व्यक्ती ही भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**१९. सदभावनापूर्वक केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण** :- हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले कोणतेही नियम यानुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीबददल राज्यशासन किंवा कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती, याच्याविरुध्द दावा, अभियोग किंवा इतर वैध कार्यवाही करता येणार नाही.

**२०. प्रत्यायोजन करावयाची शक्ती** :- राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेव्दारे असा निदेश देवू शकेल की, या अधिनियमाव्दारे किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाव्दारे राज्यशासनास प्रदान केलेल्या कोणत्याही शक्ती (नियम करण्याची शक्ती वगळता) किंवा त्याच्यावर सोपविलेले कर्तव्य अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा परीस्थितीत व अशा शर्तीस, कोणत्याही असल्यास, अधीन राहून, राज्य शासनास अधीन असलेल्या कोणत्याही अधिका-यास किंवा प्राधिकरणास वापरता येईल किंवा पार पाडता येईल.

**२१. नियम :-(१)** राज्य शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेव्दारे व पूर्वप्रसिध्दीच्या शक्तीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

**(२)** विशेषत: व पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेला हानी न पोहोचविता, अशा नियमात खालील सर्व बाबींसाठी किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल:--

**(अ)** परवान्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना व रीत, अशा परवान्यासाठी व त्याच्या नूतनीकरणासाठी द्यावयाची फी, कलम ५ अन्वये ज्या मुदतीसाठी ज्या शर्तींच्या अधीन ज्या नमुन्यात परवाना देता येईल ती मुदत, त्या शर्ती व तो नमुना;

**(ब)** परवानाधा-याने ज्याचे उल्लंघन केल्याने कलम ८ अन्वये परवाना निलंबीत करणे किंवा रद्द करणे भाग पडेल ती इतर कारणे;

**(क)** कलम १० अन्वये परवान्याच्या दुस-या प्रतीच्या संदर्भात देय असलेली फी;

**(ड)** कलम ११ अन्वये ज्या नमुन्यात व ज्या रीतीने ज्या मुदतीत आणि ज्या प्राधिका-याकडे अपील करता येईल तो नमुना व ती रीत व ती मुदत व तो प्राधिकारी आणि अपील निकालात काढतांना अपील प्राधिका-याने अनुसरावयाची कार्यपध्दती;

**(इ)** विहीत करावयाची असेल किंवा विहीत करता येईल अशी कोणतीही इतर बाब.

**(३)** या कलमान्वये केलेल्या कोणत्याही नियमात त्याचे उल्लंघन कलम १४ अन्वये शिक्षापात्र ठरेल अशी तरतूद करता येईल.

**(४)** या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितकया लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतांना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचे होईल इतक्या मुदतीकरीता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृह कबूल होतील किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचीत करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिती, अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच तो नियम अमलात येईल किंवा तो अमलात येणार नाही, तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधीग्राहयतेस बाधा येणार नाही.

**महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन)अधिनियम, १९६९.**

महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम १९६९ (सन १९६९ चा महाराष्ट्र ४५) याच्या कलम ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, याव्दारे ----

**(अ)** महाराष्ट्र राज्यामध्ये (बृहन्मुंबई व्यतिरीक्त) प्रत्येक जिल्ह्यातील सहाय्यक कृषी संचालक यांची या अधिनियमनाच्या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे, आणि

**(ब)** तो ज्या अधिकारीतेच्या हद्दीत उक्त अधिनियमाव्दारे किंवा तद्अन्वये सक्षम प्राधिका-यास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करील व त्याजवर लादण्यात आलेले कर्तव्य पार पाडेल अशा जिल्हयातील त्यांच्या अनुक्रमे अधिकारीतेच्या हद्दी निश्चित करीत आहे.

**महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९.**

महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम १९६९ (सन १९६९ चा महाराष्ट्र ४५) याच्या कलम १, पोट कलम (३) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र शासन याव्दारे १ डिसेंबर १९७६ ही तारीख उक्त अधिनियम ज्या तारखेस अमलात येईल ती तारीख म्हणून नेमून देत आहे.

**महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम, १९७६.**

महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९ (सन १९६९ चा महाराष्ट्र ४५) याच्या कलम २१, पोट कलम (२) , खंड (अ), (ब), (क), (ड) आणि (इ) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा व या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या सर्व इतर शक्तीचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत आहे. हे नियम, उक्त कलम २१, पोट कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत-

१. या नियमास, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम, १९७६ असे म्हणता येईल.

२. **व्याख्या**- या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

**(अ)** " **अधिनियम**" म्हणजे, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९;

**(ब)** " **नमुना**" म्हणजे, या नियमांस जोडण्यात आलेला नमुना;

**(क)** " **कलम**" म्हणजे, अधिनियमाचे कलम.

**३. अर्जाचे आणि लायसन्सचे नमुने व त्यासाठी असलेली फी** - (१) कलम ४ अन्वये लायसन्स घेऊ इच्छिणारा फळांच्या रोपमळयाचा कोणताही मालक, अशा प्रत्येक रोपमळयाच्या संबंधात १० रुपयाच्या लायसन्स फीसह अशा प्रत्येक रोपमळयाच्या संबंधात (सक्षम प्राधिका-याकडे) नमुना 'अ' मध्ये अर्ज करील.

(२) कलम ५ अन्वये देण्यात आलेले लायसन्स नमुना 'ब' मध्ये असेल.

**४. लायसन्स इत्यादी यांची विधिग्राह्यता** -- (१) कलम ८ च्या उपबंधास अधिन राहून , प्रत्येक लायसन्स पाच वर्षाच्या मुदतीसाठी अंमलात राहील, आणि १० रुपयाच्या नुतनीकरण फीसह, नमुना 'क' मध्ये सक्षम प्राधिका-याकडे अर्ज करून त्याचे नुतनीकरण करता येईल.

(२) पोट नियम (१) अन्वये अर्ज मिळाल्यानंतर , सक्षम प्राधिकारी , रोपमळयाची तपासणी करील किंवा तपासणी करण्याची व्यवस्था करील आणि अशी तपासणी केल्यानंतर, किंवा तपासणीचा अहवाल कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर, पाच वर्षाच्या मुदतीसाठी लायसन्सचे नुतनीकरण करील.

**५. आकारले जाणारे दर प्रदर्शित करणे**-- फळांच्या रोपमळयाचा प्रत्येक मालक, तो विक्री करत असलेल्या रोपमळयाच्या प्रत्येक रोपासाठी तो आकारीत असलेले दर, त्याच्या रोपमळयातील प्रमुख किंवा ठळक ठिकाणी, प्रदर्शित करील.

**६. नोंदवह्या**-- अधिनियमान्वये लायसन्स धारण करणारा फळांच्या रोपमळयाचा प्रत्येक मालक, लायसन्सची मुदत चालू असताना--

**(अ)** फळाचे रोप आणि त्याची जात दर्शविणारी नोंदवही आणि फळाचे रोप वाढविताना वापरण्यात आलेल्या प्रत्येक मुलकांडाच्या (रुट स्टॉक) आणि कलमाच्या (सायन) झाडाची जागा दर्शविणारा आराखडा नमुना 'ड' मध्ये ठेवील,

**(ब)** लायसन्सधारकाने आपल्या रोपमळयात रोपांची पैदास करण्यासाठी राज्यातील कोणत्याही अन्य रोपमळयातील कोणत्याही रोपापासून बियाणे घेतलेले असेल त्या बाबतीत नमुना 'इ' मध्ये नोंदवही ठेवील,

**(क)** त्याने तयार केलेल्या फळांच्या रोपांच्या संपूर्ण विक्रीचा तपशील दर्शविणारी नोंदवही नमुना ' फ' मध्ये ठेवील.

**(ड)** विवरणपत्रे सादर करणे.

**(ई)** पावती देणे- वय नमूद करणे.

**७. फळांच्या रोपांचे वय निश्चित करण्याची रीत** - कलम ६, खंड (फ) च्या प्रयोजनासाठी , फळाच्या रोपांचे वय पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल -

**(अ)** (Seedling) रोपांच्या बाबतीत, बी पेरल्याच्या तारखेपासून,

**(ब)** छाट कलमाच्या बाबतीत, छाट कलम रोपमळ्यातील वाफ्यात लावल्याच्या तारखेपासून,

**(क)** अंकुरित किंवा कलमाच्या रोपांच्या बाबतीत, ( मूलकांड आणि कलम यांची वये वेगवेगळी दर्शविण्यात येतील) रोपाच्या बाबतीत ज्याप्रमाणे वय निश्चित करण्यात येते त्याचप्रमाणे मुलकांडाचे वय निश्चित करण्यात येईल आणि कलमाच्या बाबतीत ते कलम केल्याच्या तारखेपासून वय निश्चित करण्यात येईल,

**(ड)** दाब कलमाच्या (लेअर्ड प्लॅट) बाबतीत, दाब कलमाची क्रिया केल्याच्या तारखेपासून.

**(इ)** नविन प्रस्तावित उती संवर्धनाचे रोपे व त्याचे वय.

**८. सक्षम प्राधिका-याकडून तांत्रिक सूचना-** फळांच्या रोपांचा दर्जा चांगला रहावा यासाठी फळांची रोपे कोणत्या रीतीने वाढवावीत याविषयीच्या तांत्रिक सूचना, सक्षम प्राधिका-याकडून लेखी स्वरूपात देण्यात येतील आणि त्या नोंदणीकृत डाकेने लायसन्सधारकांना कळवण्यात येतील. या सूचना , त्या दिल्याची तारीख किंवा पत्रात विनिर्दिष्ट केलेली तारीख यापैकी जी तारीख नंतरची असेल त्या तारखेनंतर सहा महिने अंमलात राहतील.

**९. लेबलचा नमुना** - रोपमळयातील रोपावर लावावयाचे लेबल, खूण, चिठ्ठी नमुना 'ग' मध्ये असेल.

**१०. लायसन्सच्या दुस-या प्रतीसाठी फी** - लायसन्सची दुसरी प्रत देण्याकरता आकारली जाणारी फी पाच रूपये असेल.

**११. अपील.-**

(१) कलम ११ अन्वये सक्षम प्राधिका-याच्या आदेशाविरुध्द करावयाचे अपील पोट नियम (२) अन्वये रचना करण्यात आलेल्या अपील प्राधिकरणाकडे सक्षम प्राधिका-याच्या आदेशाच्या तारखेपासून ९० दिवसाच्या आत नमुना 'ह' मध्ये करण्यात येईल.

(२) अपील प्राधिकरण तीन सदस्यांचे मिळून होईल आणि कृषि संचालक त्याचे अध्यक्ष असतील.

(३) अध्यक्षांव्यतिरिक्त इतर सदस्य राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील आणि ते या नियमाचा प्रारंभ झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षाच्या मुदतीसाठी पद धारण करतील.

**१२. फळांच्या रोपमळयात प्रवेश करण्याची व त्याची तपासणी करण्याची वेळ**. - सक्षम प्राधिका-यास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तींना कलम १३ अन्वये प्रवेश करण्याच्या व तपासणी करण्याच्या शक्तींचा कोणत्याही दिवशी सकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत वापर करता येईल.

**१३. शास्ती.**- या नियमातील नियम ४ किंवा ६ यांच्या उपबंधाचे उल्लंघन करील अशी कोणतीही व्यक्ती अधिनियमाच्या कलम १४ अन्वये शिक्षापात्र ठरेल.

**नमुना 'अ'**

(नियम ३(१) पहा)

**महाराष्ट्र फळांचे रोपमळे ( नियमन) अधिनियम, १९६९ याच्या कलम ३ खालील लायसन्ससाठी द्यावयाच्या अर्जाचा नमुना**

(१) रोपमळयाचे नाव —

(२) मालकाचे नाव आणि पूर्ण पत्ता -

(३) रोपमळयाचे निश्चित ठिकाण -
(अ) जिल्हा
(ब) शहर किंवा गाव
(क) नजीकचे रेल्वे स्थानक

(४) जनक रोपासह रोपमळयाचे एकूण क्षेत्र, त्याच्या भूमापन क्रमांकासह -

**अ. जनक झाडाचा तपशील-**
(अ) भूमापन क्रमांक व क्षेत्र -
(ब) फळांच्या रोपांचे प्रकार त्यांच्या जातीसह
(क) फळांच्या रोपांची संख्या
(ड) फळांच्या रोपांचे वय, जनक रोपांचा उगम

जनक रोपांच्या उगमाविषयी माहिती उपलब्ध नसेल त्याबाबतीत, त्या रोपांचा जनक रोपे म्हणून वापर करण्यापूर्वीचे त्यांचे उत्पन्न व फळांचा दर्जा.

**ब. मुलकांडाच्या जनक रोपांचा तपशील-**
(अ) भूमापन क्रमांक व क्षेत्र -
(ब) मुलकांडाचा प्रकार व जाती -
(क) रोपांची संख्या -
(ड) रोपांचे वय -
(इ) जनक रोपांचा उगम-

मूलकांड रोपे त्याची स्वतःची नसतील तर ती कोठून मिळविण्यात येतील त्याचा तपशील देण्यात यावा.

**क. दरवर्षी ज्या फळाचे पीक काढण्याची अर्जदाराची इच्छा आहे त्या प्रत्येक फळाच्या पिकाच्या जातींच्या तपशिलासह ग्राफ्टेड (कलम केलेल्या ) , बडेड ( डोळा भरण्यात आलेल्या) किंवा रुटेड कलमांची संख्या -**

| फळांच्या रोपाचे नाव | जाती | पैदाशीची पध्दती | पैदास करावयाच्या रोपांची संख्या. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

(५) अर्जदार रोपमळयाचा व्व्वसाय किती काळ करीत
आहे? तसे असल्यास , मागील दोन वर्षात दरवर्षी
तयार केलेल्या व विक्री केलेल्या फळांच्या रोपांची
संख्या प्रत्येक जातीसाठी वेगळी देण्यात यावी.

(६) कीटक, कीड आणि वनस्पती रोग यांच्या प्रतिबंधासाठी
उपलब्ध असलेल्या साधनांचा तपशील.

(७) दिलेल्या लायसन्स फीचा तपशील

**(८) प्रतिज्ञापन** -

(अ)मी, याद्वारे , प्रतिज्ञापन करतो की, वर देण्यात आलेली माहिती, माझ्या संपूर्ण माहिती नुसार व विश्वासानुसार खरी
आहे.

(ब) मी, अधिनियम आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम वाचले असून, वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल
अशा अधिनियमात व नियमात विहित करण्यात आलेल्या सर्व अटी पूर्ण करण्याची हमी देत आहे.

(क) मी केवळ दर्जेदार रोपे वाजवी किंमतीने विकण्याची हमी देत आहे.

(ड) मी माझ्या रोपमळयात सध्या उपलब्ध नाहीत अशा कलमाची व मूलकांडाची जनक रोपे, रोपे लावण्याच्या पुढील
हंगामात लावीन अशी हमी देतो.

अर्जदाराची सही.

पत्ता -

ठिकाण -

दिनांक -

**नमुना 'ब'**

नियम३(२) पहा

पुस्तक क्रमांक

लायसन्स क्रमांक
दिल्याची तारीख--------------------------
----------------------- पर्यन्त विधिग्

**महाराष्ट्र राज्यात फळांच्या रोपमळयांच्या धंदा चालविण्यासाठी किंवा करण्यासाठी लायसन्स.**

श्री .-------------------------------------- यास, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९ याच्या उपबंधास अधीन राहून, पुढील अटी व शर्तीवर दिनांक पासून राज्यात --------------------------------
-------------------
येथे ( येथे रोपमळयाची जागा नमुद करावी) ( यात यापुढे जिचा निर्देश " लायसन्स दिलेली जागा" असा करण्यात आला आहे) फळांच्या रोपमळयांचा धंदा चालविण्यासाठी किंवा करण्यासाठी याद्वारे लायसन्स देण्यात येत आहे.

| फळाच्या रोपमळयाचे नाव. | फळाच्या रोपमळयाची जागा | फळाच्या रोपमळयाचे एकूण क्षेत्र. | या लायसन्सखाली नेहमीच्या धंद्याच्या ओघात पैदास व विक्री करावयाच्या फळांच्या रोपांचे नाव व प्रकार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

सक्षम प्राधिका-याची सही

ठिकाण -

पदनाम -

दिनांक -

**लायसन्सच्या अटी व शर्ती**

(१) हे लायसन्स, लायसन्स दिलेल्या जागेत महत्वाच्या व ठळक जागी लावण्यात येईल.

(२) लायसन्सधारक, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९ आणि वेळोवेळी त्याखाली तयार करण्यात आलेले नियम, यांच्या उपबंधाचे पालन करतील.

(३) लायसन्सधारक, ज्या फळांच्या रोपांच्या संबंधात, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९ अन्वये लायसन्स देण्यात आलेले आहे त्या फळांच्या रोपाव्यतिरीक्त इतर कोणतीही फळांची रोपे लायसन्स दिलेल्या जागेत ठेवणार नाही.

(४) लायसन्सधारक, तो फळांच्या रोपांची विक्री करीत असेल अशा जागेत कोणताही बदल झाल्यास तो बदल वेळोवेळी सक्षम प्राधिका-यास कळवील.

## नमुना 'क'
(नियम ४ पहा)

### महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९ अन्वये लायसन्सचे नुतनीकरण करण्यासाठी करावयाचा अर्जाचा नमुना.

सहायक कृषि संचालक,
जिल्हा

यांस,

मी, आम्ही, ---------------------------------------------------------------------------------- नावाने फळांच्या रोपांची पैदास व विक्री यांचा धंदा करण्यासाठी असलेल्या लायसन्सच्या नवीकरणासाठी याद्वारे , अर्ज करीत आहे/ आहोत. मूळ लायसन्स, सहायक कृषि संचालक, जिल्हा ----------------------- यांनी, क्रमांक --- ---------------- अन्वये पाच वर्षाच्या कालावधी साठी दिले होते व त्याची मुदत दिनांक ------------------------ ----------------------- ला समाप्त होत आहे.

(१) जनक रोपासह रोपमळ्याचे एकूण क्षेत्र
भूमापन क्रमांकासह.

जनक रोपांचा तपशील -
(अ) भूमापन क्रमांक व क्षेत्र
(ब) जातीसह फळांच्या रोपाचा प्रकार
(क) फळांच्या रोपांची संख्या
(ड) फळांच्या रोपांचे वय, जनक रोपांचा उगम, जनक रोपांच्या उगमाविषयी माहिती उपलब्ध नसेल त्या बाबतीत , त्या रोपांचा जनक रोपे म्हणून वापर करण्यापूर्वीचे त्यांचे उत्पन्न व फळाचा दर्जा.

(२) दरवर्षी ज्या फळांचे पीक काढण्याची अर्जदाराची इच्छा आहे त्या प्रत्येक फळाच्या पिकाच्या जातींच्या तपशीलासह, ग्राफ्टेड, बडेड, किंवा रूटेड कलमांची संख्या –

| फळाचे नाव | प्रकार | पैदाशीची पध्दती | पैदाशीच्या फळांच्या रोपांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

(३) कीटक, कीड आणि वनस्पती रोग यांच्या प्रतिबंधासाठी उपलब्ध असलेल्या साधनांचा तपशिल.

(४) दरवर्षी तयार केलेल्या व विक्री केलेल्या फळांच्या रोपांची संख्या प्रत्येक प्रकारासाठी वेगळी देण्यात यावी.

| वर्ष | फळाच्या रोपाचे नाव | प्रकार | तयार केलेल्या रोपांची संख्या | विक्री केलेली संख्या | विक्रीचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

(५) लायसन्सच्या नुतनीकरणाची फी म्हणुन ----------------- रूपये ----------- इतकी रक्कम यासोबत चेकने /मनिऑर्डरने/ रोख भरणा करण्यात येत आहे.

**प्रतिज्ञापन**

(१) मी, याद्वारे, प्रतिज्ञापन करतो की, वर देण्यात आलेली माहिती माझ्या संपूर्ण माहिती नुसार व विश्वासानुसार खरी
आहे.

(२) मी, अधिनियम आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम वाचले असून, अधिनियमात आणि नियमात विहित
करण्यात आलेल्या आणि अधिनियम व नियम यानुसार सक्षम प्राधिका-याकडून विहित करण्यात येतील अशा सर्व अटी पूर्ण करण्याची हमी देत आहे.

(३) मी केवळ दर्जेदार रोपे वाजवी किंमतीने विकण्याची हमी देत आहे.

अर्जदाराची सही.

पत्ता -
दिनांक -

## नमुना ' ड'

नियम ६(अ) पहा.

### फळांच्या रोपांची पैदास करण्यासाठी वापरण्यात आलेल्या जनक रोपांचा उगम दर्शविणारी नोंदवही

| ज्या फळांच्या रोपमळयातील रोपांच्या पैदाशीसाठी वापरण्यात येतात त्या फळांच्या रोपमळयाची जागा भूमापन क्रमांकासह | फळ झाडाचे नाव व प्रकार | | फळबागेत झाडाला नेमून देण्यात आलेला क्रमांक | |
|---|---|---|---|---|
| | मूलकांड ( रुट स्टॉक) | कलम (सायन) | मूलकांड ( रुट स्टॉक) | कलम (सायन) |
| १ | २ | | ३ | |
| | | | | |

## नमुना ' ई '

नियम ६ (ब) पहा.

### पैदास करण्यात आलेली व विक्रीसाठी तयार असलेली फळांची रोपे दर्शविणारी नोंदवही

| फळ झाडांचे नाव व प्रकार | रोपमळ्यात जनक झाडाला नेमून दिलेला क्रमांक.<br>मूलकांड (रूट स्टॉक) कलम (सायन) | पैदास केलेल्या झाडांची संख्या | रोप लावणीकरता विक्रीसाठी तयार असलेल्या फळांच्या रोपांची संख्या १५ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

## नमुना ' फ '

नियम ६ ( क ) पहा.

## फळांच्या रोपांच्या विक्रीची नोंदवही

| विक्रीची तारीख | ज्या व्यक्तीला रोपे विकण्यात आलेली आहेत त्या व्यक्तीचे नाव व पत्ता | विक्रीसाठी तयार करण्यात आलेल्या फळांच्या रोपांचा उगम. | | ज्या दराने विक्री करण्यात आली तो दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | नेमून दिलेला मूलकांड क्रमांक | नेमून दिलेला कलम क्रमांक | | |
| १ | २ | ३ | | ४ | ५ |
| | | | | | |

## नमुना 'ग'

( नियम ९ पहा )

रोपमळयाचे नाव व पत्ता

वय

मूलकांड ( रूट स्टॉक )

कलम ( सायन )

# नमुना ' ह '

नियम ११ (१) पहा.

## सक्षम प्राधिका-याच्या निर्णयाविरुध्दच्या अपीलासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

---------------------------------------------------------------- या नावाने, फळांच्या रोपांच्या उत्पादनाचा व विक्रीचा धंदा चालविण्यासाठी मला/आम्हाला दिलेल्या लायसन्स क्रमांक --------------- चा धारक मी / आम्ही उक्त लायसन्स देण्यास किंवा लायसन्सचे नुतनीकरण करुन देण्यास नकार देण्याच्या किंवा लायसन्स निलंबित करण्याच्या किंवा रद्द करण्याच्या संबंधातील ------------------------------------ (सक्षम प्राधिका-याचे पदनाम) याच्या निर्णयाचा फेर विचार व्हावा म्हणून, याद्वारे अपील करीत आहे/ आहोत.

लायसन्स देणा-या प्राधिका-याने
आदेश दिल्याची तारीख व क्रमांक.

आमच्या वरील अपिलासाठीची कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

पत्ता -

दिनांक -

अर्जदाराचे नाव.

-----------------------

## महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम, १९७६.

महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम, १९७६ याच्या नियम ११, पोट-नियम (३) च्या उपबंधानुसार, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील व्यक्तींना अपील प्राधिकरणाचे सदस्य म्हणून नामनिर्दिष्ट करीत आहे.

(१) श्री. रणजित देशमुख, सभापती, पंचायत समिती, काटोल, जिल्हा नागपूर.
(२) श्री. दत्ता कांचन, मुक्काम पोस्ट ऊरुळी-कांचन, तालुका हवेली, जिल्हा - पुणे.

**महाराष्ट्र फळांचे रोपमळे ( नियमन ) ( सुधारणा ) नियम , १९८० .**

महाराष्ट्र फळांचे रोपमळे ( नियमन) अधिनियम, १९६९ (सन १९६९ चा महाराष्ट्र ४५) याच्या कलम २१, पोट कलम (२) , खंड (अ), (ब), (ड) आणि (इ) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा व या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या सर्व इतर शक्तीचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र फळांचे रोपमळे ( नियमन) नियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरता याद्वारे पुढील नियम करीत आहे. हे नियम, उक्त कलम २१ च्या पोट कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत -

**१.** या नियमांस, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) (सुधारणा) नियम, १९७८ असे म्हणता येईल.

**२.** महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम " असा करण्यात आला आहे) याच्या नियम २ ला त्या नियमाचा पॉट नियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट नियम (१) नंतर पुढील पोट नियम दाखल करण्यात येईल.

"(२) या नियमात वापरण्यात आलेल्या परंतु त्यात व्याख्या करण्यात न आलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना त्यांना अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आले आहेत तेच अर्थ असतील."

**३.** मुख्य नियमांच्या नियम ११ मध्ये, -

(अ) पोट नियम (१) ऐवजी पुढील पोट नियम दाखल करण्यात येईल -

"(१) कलम ११ अन्वये सक्षम प्राधिका-याच्या आदेशाविरूध्द करावयाचे अपील, पोट नियम (२) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या अपील प्राधिकरणाकडे अपीलकारास सक्षम प्राधिका-याच्या आदेश मिळाल्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत नमुना ' ह ' मध्ये करण्यात येईल."

(ब) पोट नियम (३) ऐवजी पुढील पोट नियम दाखल करण्यात येईल -

"(३) अध्यक्षाव्यतिरिक्त इतर सदस्य, राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील आणि ते, पदनिर्देशित झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षाच्या मुदतीसाठी पद धारण करतील."

**४.** मुख्य नियमांच्या नियम १२ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल -

"१२. फळांच्या रोपमळयांत प्रवेश करण्याची व त्यांची तपासणी करण्याची वेळ. -

सक्षम प्राधिका-यास किंवा त्याने यथोचितरीत्या लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तींना कलम १३ अन्वये असलेल्या प्रवेश करण्याच्या व तपासणी करण्याच्या शक्तींचा कोणत्याही दिवशी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत वापर करता येईल."

**५.** मुख्य नियमांना जोडण्यात आलेल्या नमुना 'अ' मध्ये,-

(अ) शीर्षकामधील "कलम ३ अन्वये" या मजकुराऐवजी "कलम ५ अन्वये"हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) खंड (३) मध्ये उपखंड (अ) नंतर पुढील उपखंड दाखल करण्यात येईल-

"(ब) तहसिल";

(क) अशा प्रकारे दाखल करण्यात आलेल्या उपखंड (ब) नंतर सध्याच्या उपखंड (ब) आणि (क) यांना अनुक्रमे उपखंड (क) आणि (ड) असे नवीन क्रमांक देण्यात येईल.

**६.** मुख्य नियमांना जोडण्यात आलेल्या नमुना ' ब ' मध्ये, " पदनाम " या शब्दाच्या खाली पुढील शब्द दाखल करण्यात येईल. ---

“ मुद्रा”.

**७.** मुख्य नियमांना नमुना 'ह' मध्ये, "आमच्या वरील अपिलासाठीची कारणे पुढील प्रमाणे आहेत" या मजकुराऐवजी " वरील अपिलाच्या पुष्ठ्यर्थची कारणे पुढीलप्रमाणे आहेत." हा मजकूर दाखल करण्यात येईल.

## सहपत्र क्र. - १

| अ.क्र. | पिकाचे नाव | विक्रीयोग्य स्थिती | अ.क्र. | पिकाचे नाव | विक्रीयोग्य स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | आंबा | बांधल्यानंतर १ वर्ष | २४ | लिची | |
| २ | काजू | | २५ | लवंग | |
| ३ | नारळ | उगविल्यानंतर ९ महिन्यांनी | २६ | जायफळ | |
| ४ | सुपारी | | २७ | दालचिनी | |
| ५ | चिकू | भेट कलम- उतरविल्यानंतर ६० दिवस | २८ | मिरी | छाट कलम लावल्यानंतर १२० दिवसांनी. |
| ६ | फणस | | २९ | जोजोबा | |
| ७ | संत्रा | डोळे भरल्यानंतर १५० दिवसांनी<br>शेंडा कलम बांधल्यांनतर १२० दिवसांनी | ३० | आइरन | |
| ८ | मोसंबी | | ३१ | अर्जून | |
| ९ | का. लिंबू | | ३२ | असन | |
| १० | पपनस | | ३३ | अशोक | |
| ११ | पेरु | उतरविल्यानंतर ४५ दिवस | ३४ | बेल | |
| १२ | डाळिंब | उतरविल्यानंतर ४५ दिवस | ३५ | गुग्गुळ | |
| १३ | अंजीर | | ३६ | लोध्र | |
| १४ | सिताफळ | | ३७ | रक्तचंदन | |
| १५ | रामफळ | | ३८ | शिवण | |
| १६ | आवळा | | ३९ | टेटू | |
| १७ | कवठ | | ४० | बेहडा | |
| १८ | बोर | | ४१ | बिब्बा | |
| १९ | जांभूळ | | ४२ | डिकेमाली | |
| २० | फालसा | | ४३ | हिरडा | |
| २१ | चिंच | | ४४ | रिठा | |
| २२ | कोकम | | ४५ | वावडींग | |
| २३ | चारोळी | | ४६ | करंज | |

# महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम, १९७६

महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९ (सन १९६९ चा महाराष्ट्र ४५) याच्या कलम २१, पोट-कलम (२), खंड (अ), (ब), (क), (ड) आणि (इ) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा व या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या सर्व इतर शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत आहे, हे नियम, उक्त कलम २१, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत:--

१. या नियमांस, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम, १९७६ असे म्हणता येईल.

२. **व्याख्या.--**या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,---

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९;

(ब) "नमुना" म्हणजे, या नियमांस जोडण्यात आलेला नमुना;

(क) "कलम" म्हणजे, अधिनियमाचे कलम.

३. **अर्जाचे आणि लायसनचे नमुने व त्यासाठी असलेली फी.--**(१) कलम ४ अन्वये लायसन घेऊ इच्छिणारा फळांच्या रोपमळ्याचा कोणताही मालक, अशा प्रत्येक रोपमळ्याच्या संबंधात १० रुपयांच्या लायसन फीसह अशा प्रत्येक रोपमळ्याच्या संबंधात (सक्षम प्राधिकाऱ्याकडे) नमुना 'अ' मध्ये अर्ज करील.

(२) कलम ५ अन्वये देण्यात आलेले लायसन नमुना 'ब' मध्ये असेल.

४. **लायसन इत्यादी यांची विधिग्राह्यता.--**(१) कलम ८ च्या उपबंधास अधीन राहून, प्रत्येक लायसन पाच वर्षांच्या मुदतीसाठी अंमलात राहील, आणि १० रुपयांच्या नवीकरण फीसह, नमुना 'क' मध्ये सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करून त्याचे नवीकरण करता येईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये अर्ज मिळाल्यानंतर, सक्षम प्राधिकारी, रोपमळ्याची तपासणी करील किंवा तपासणी करण्याची व्यवस्था करील आणि अशी तपासणी केल्यानंतर, किंवा तपासणीचा अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, पाच वर्षांच्या मुदतीसाठी लायसनचे नवीकरण करील.

५. **आकारले जाणारे दर प्रदर्शित करणे.--**फळांच्या रोपमळ्याचा प्रत्येक मालक, तो विक्री करत असलेल्या रोपमळ्याच्या प्रत्येक रोपासाठी तो आकारीत असलेले दर, त्याच्या रोपमळ्यातील प्रमुख किंवा ठळक ठिकाणी, प्रदर्शित करील.

६. **नोंदवह्या.--**अधिनियमान्वये लायसन धारण करणारा फळांच्या रोपमळ्याचा प्रत्येक मालक, लायसनची मुदत चालू असताना--

(अ) फळाचे रोप आणि त्याची जात दर्शविणारी नोंदवही आणि फळाचे रोप वाढविताना वापरण्यात आलेल्या प्रत्येक मुलकांडाच्या (रूट स्टॉक) आणि कलमाच्या (सायन) (Scion) झाडाची जागा दर्शविणारा आराखडा नमुना 'ड' मध्ये ठेवील,

(ब) लायसनधारकाने आपल्या रोपमळ्यात रोपांची पैदास करण्यासाठी राज्यातील कोणत्याही अन्य रोपमळ्यातील कोणत्याही रोपापासून बियाणे घेतलेले असेल त्या बाबतीत, नमुना 'इ' मध्ये नोंदवही ठेवील,

(क) त्याने तयार केलेल्या फळांच्या रोपांच्या संपूर्ण विक्रीचा तपशील दर्शविणारी नोंदवही नमुना 'फ' मध्ये ठेवील,

७. **फळाच्या रोपांचे वय निश्चित करण्याची रीत.**—कलम ६, खंड (फ) च्या प्रयोजनासाठी, फळाच्या रोपांचे वय पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल :—

(अ) (Seedlings) रोपांच्या बाबतीत, बी पेरल्याच्या तारखेपासून,

(ब) छाट कलमाच्या बाबतीत, छाट कलम रोपमळ्यातील वाफ्यांत लावल्याच्या तारखेपासून,

(क) अंकुरित किंवा कलमाच्या रोपांच्या बाबतीत, (मूलकांड आणि कलम यांची वये वेगवेगळी दर्शविण्यात येतील) रोपाच्या बाबतीत ज्याप्रमाणे वय निश्चित करण्यात येते त्याचप्रमाणे मुलकांडाचे वय निश्चित करण्यात येईल आणि कलमाच्या बाबतीत ते कलम केल्याच्या तारखेपासून वय निश्चित करण्यात येईल,

(ड) दाब कलमाच्या (लेअर्ड प्लँट) बाबतीत, दाब कलमाची क्रिया केल्याच्या तारखेपासून.

८. **सक्षम प्राधिकाऱ्याकडून तांत्रिक सूचना.**—फळांच्या रोपांचा दर्जा चांगला रहावा यासाठी फळांची रोपे कोणत्या रीतीने वाढवावीत याविषयीच्या तांत्रिक सूचना, सक्षम प्राधिकाऱ्याकडून लेखी स्वरूपात देण्यात येतील आणि त्या नोंदणीकृत डाकेने लायसनधारकांना कळवण्यात येतील. या सूचना, त्या दिल्याची तारीख किंवा पत्रात विनिर्दिष्ट केलेली तारीख यापैकी जी तारीख नंतरची असेल त्या तारखेनंतर सहा महिने अंमलात राहतील.

९. **लेबलचा नमुना.**—रोपमळ्यातील रोपावर लावावयाचे लेबल खूण चिठ्ठी नमुना 'ग' मध्ये असेल.

१०. **लायसनच्या दुसऱ्या प्रतीसाठी फी.**—लायसनची दुसरी प्रत देण्याकरता आकारली जाणारी फी पाच रुपये असेल.

११. **अपील.**—(१) कलम ११ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध करावयाचे अपील पोट-नियम (२) अन्वये रचना करण्यात आलेल्या अपील प्राधिकरणाकडे सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत नमुना 'ह' मध्ये करण्यात येईल.

(२) अपील प्राधिकरण तीन सदस्यांचे मिळून होईल आणि कृषि संचालक त्याचे अध्यक्ष असतील.

(३) अध्यक्षाव्यतिरिक्त इतर सदस्य राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील आणि ते या नियमाचा प्रारंभ झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करतील.

१२. **फळांच्या रोपमळ्यात प्रवेश करण्याची व त्याची तपासणी करण्याची वेळ.**—सक्षम प्राधिकाऱ्यास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तींना कलम १३ अन्वये प्रवेश करण्याच्या व तपासणी करणाच्या शक्तींचा कोणत्याही दिवशी सकाळी ७ ते रात्री ८ या वेळेत वापर करता येईल.

१३. **शास्ती.**—या नियमातील नियम ४ किंवा ६ यांच्या उपबंधाचे उल्लंघन करील अशी कोणतीही व्यक्ती अधिनियमाच्या कलम १४ अन्वये शिक्षापात्र ठरेल.

# महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) (सुधारणा) नियम, १९८०

महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) अधिनियम, १९६९ (सन १९६९ चा महाराष्ट्र ४५) याच्या कलम २१, पोट-कलम (२), खंड (अ), (ब), (ड) आणि (इ) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा व या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या सर्व इतर शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरता याद्वारे पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम २१ च्या पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत :—

१. या नियमांस, महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) (सुधारणा) नियम, १९७८ असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र फळांचे रोपमळे (नियमन) नियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) याच्या नियम २ ला त्या नियमाचा पोट-नियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-नियम (१) नंतर पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

"(२) या नियमात वापरण्यात आलेल्या परंतु त्यात व्याख्या करण्यात न आलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना त्यांना अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आले आहेत तेच अर्थ असतील."

३. मुख्य नियमांच्या नियम ११ मध्ये,—

(अ) पोट-नियम (१) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

"(१) कलम ११ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध करावयाचे अपील, पोट-नियम (२) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या अपील प्राधिकरणाकडे अपीलकारास सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेश मिळाल्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत नमुना 'ह' मध्ये करण्यात येईल.";

(ब) पोट-नियम (३) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

"(३) अध्यक्षाव्यतिरिक्त इतर सदस्य, राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील आणि ते, पदनिर्देशित झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करतील.".

४. मुख्य नियमांच्या नियम १२ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"**१२. फळांच्या रोपमळ्यांत प्रवेश करण्याची व त्यांची तपासणी करण्याची वेळ.**— सक्षम प्राधिकाऱ्यास किंवा त्याने यथोचितरीत्या लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तींना कलम १३ अन्वये असलेल्या प्रवेश करण्याच्या व तपासणी करण्याच्या शक्तींचा कोणत्याही दिवशी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत वापर करता येईल."

५. मुख्य नियमांना जोडण्यात आलेल्या नमुना 'अ' मध्ये,—

(अ) शीर्षकामधील "कलम ३ अन्वये" या मजकुराऐवजी "कलम ५ अन्वये" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) खंड (३) मध्ये उपखंड (अ) नंतर पुढील उपखंड दाखल करण्यात येईल :—

"(ब) तहसिल";

(क) अशा प्रकारे दाखल करण्यात आलेल्या उपखंड (ब) नंतर सध्याच्या उपखंड (ब) आणि (क) यांना अनुक्रमे उपखंड (क) आणि (ड) असे नवीन क्रमांक देण्यात येईल.

६. मुख्य नियमांना जोडण्यात आलेल्या नमुना 'ब' मध्ये, "पदनाम" या शब्दाच्या खाली पुढील शब्द दाखल करण्यात येईल :—

"मुद्रा".

७. मुख्य नियमांच्या नमुना 'ह' मध्ये, "आमच्या वरील अपिलासाठीची कारणे पुढील-प्रमाणे आहेत" या मजकुराऐवजी "वरील अपिलाच्या पुष्ठ्यर्थंची कारणे पुढीलप्रमाणे आहेत." हा मजकूर दाखल करण्यात येईल.